माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**
**तक्रार क्रमांक : ३९/२०१९, ४०/२०१९ व ४१/२०१९**

**तक्रारकर्ता, श्री.दत्तराव साहेबराव जाधव,**
**मु.पो.शिरपुर जैन, ता.मालेगांव, जि.वाशिम**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचे कार्यालय,**
**जिल्हा परिषद, वाशिम, ता.जि.वाशिम**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.),**
**जिल्हा परिषद, वाशिम, ता.जि.वाशिम**

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २९.०८.२०२३**

**तक्रारकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : अनुपस्थित**
**प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित**

| तक्रार क्रमांक | द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्जाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ३९/२०१९ | १६.०८.२०१८ | निरंक | ०३.०५.२०१९ |
| ४०/२०१९ | १६.०८.२०१८ | निरंक | ०६.०५.२०१९ |
| ४१/२०१९ | १६.०८.२०१८ | निरंक | १३.०५.२०१९ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र.४२२९/२०१४, १३६९/२०१५, व १३६८/२०१५ यात दि.१६.०८.२०१८ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीवर दिनांक २९.०८.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील (अपील क्र. ४२२९/२०१४) मध्ये दिनांक १६.०८.२०१८ रोजी सुनावणी घेवून "१. अपीलार्थीस अद्यापही माहिती देण्यात आली नसल्यामूळे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस जोडपत्र-अ नूसार मागितलेली माहिती नोंदणीकृत डाकेने विनाशुल्क पुरवावी व तसा अनुपालन अहवाल हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाच्या मुदतीत आयोगास सादर करावा. २. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.डी.व्ही.तरोळे यांनी कलम ७(१) चा भंग केल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) नूसार त्यांना **रु.५०००/-** (रुपये पाच हजार फक्त) एवढी शास्ती